
डॉ. नितीन मोरे

# या कोल्हटकरांच्या घरात



# या कोल्हटकरांच्या घरात

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# या कोल्हटकरांच्या घरात (नाटक)

लेखक  :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ९ जुलै २०१७

(गुरूपौर्णिमा))

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत

या कोल्हटकरांच्या घरात हे मी लिहीलेले पहिलेच नाटक !

या नाटकाची गोष्ट सुचली ती एका पारशी लग्नाळू मुलाच्या न जमणा-या लग्नावरून. त्याने कित्येक मुली पाहिल्या असतील..सर्वांना या ना त्या कारणाने नकार. शेवटी त्याच्या घरच्यांनी एक प्लॅन बनवला. त्याच्या वडिलांना खोटे खोटे आजारी पाडले. तर या पठ्ठ्याने काय करावे? तडक हॉस्पिटलची रूमच बुक करून घरी आला! नाटक वठवायला शेवटी हॉस्पिटलचा भुर्दंड पडलाच नि लग्नाची बात नाही ती नाहीच ! असो. नाटकात मात्र तो मुलगा पारशी नाही पण झालेला सासरा मात्र पारशी आहे !

पारशांची बोलण्याची पद्धत त्यांच्या एकूणच स्वभावानुसार मोकळीढाकळी असते. तशीच ह्या नाटकात दिसेल.

या कोल्हटकरांच्या घरात घडणारी ही गोष्ट एकूणच हलक्याफुलक्या पद्धतीने लिहीण्याचा मी प्रयत्न केला आहे.

हा प्रयत्न किती यशस्वी ते वाचकच ठरवतील.

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे



डॉ नितीन मोरे यांचा वसई येथे छातीरोग तज्ञ म्हणून यशस्वी व्यवसाय असला तरी त्यांचे प्रथम प्रेम साहित्यावरच आहे.

प्रचंड वाचनाबरोबरच त्यांचे लेखनही विविध आणि विपुल आहे.

या कोल्हटकरांच्या घरात ’ हे त्यांचे ई साहित्यवरचे सहावे पुस्तक या आधी त्यांची ई साहित्यवर पाच पुस्तके प्रकाशित

1. **चक्रमादित्याचा दरबार,**
2. **केल्याने शीर्षासन,**
3. **नाच जमूरे नाच,**
4. **अहम ब्रह्मास्मि,**
5. **मच्छर टाईम्स**

त्यांची खुसखुशीत मार्मिक शैली आणि सर्वसामान्य वाचकांच्या जिव्हाळयाचे विषय यांमुळे वाचकांत ते अत्यंत लोकप्रिय आहेत.

दिवाळी अंकात त्यांच्या विनोदी कथा नियमित प्रकाशित होत असतात.

एकूण उपहास, उपहासात्मक विनोद वा निखळ विनोद हे साहित्यातले प्रकार हाताळायला त्यांना आवडते.

त्यांच्या पुस्तकांवरचे अभिप्राय जाणून घ्यायला ते नेहमीच उत्सुक असतात. आपण त्यांना खालील मार्गांनी संपर्क करू शकता.

डॉ. नितीन मोरे (वसई, मुंबई)

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

# या कोल्हटकरांच्या घरात

या कोल्हटकरांच्या घरात.. ..

# अंक पहिला

प्रवेश एक

सूत्रधार

या या या या! या कोल्हटकरांच्या घरात! स्वागत आहे तुमचे.. सुस्वागतम.. वेलकम..

आता हे घर कोल्हटकरांचे.

जरा ओळख करून देतो.

श्रीयुत कमलाकर कोल्हटकर, एका खाजगी कंपनीत मोठ्या हुदयावर आहेत. सरकारी नोकरीत असते तर टायर होऊन रिटायर म्हणजे पेन्शनर झाले असते! म्हणजे त्यांच्या वयाचा अंदाज येईल. आहेत पण वृत्तीने मात्र निवृत्त.. कंपनीत त्यांना मान आहे. त्यामुळे त्यांच्या वयानुसार निवृत्ती न होता ते एक्स्टेंशन मिळवत आले आहेत.

आणि मिसेस कुमुद कमलाकर कोल्हटकर. काही वर्षांपूर्वीच शाळेच्या हेडमास्तरीण म्हणून निवृत्त.. आता काही वर्षं म्हंटली की वयाचा अंदाज येईल.. तो येऊ नये म्हणून त्या हल्लीच व्हीआरएस घेतली सांगतात!

त्यांची कन्या कल्याणी. लग्न होऊन सासरी घोषबाबूंच्या घरी गेलेली. हा आंतरप्रांतीय आंतरभाषीय विवाह दोन्हीकडून व्यवस्थित पचवला गेलाय आतापर्यंत.

राहता राहिला त्यांचा सुपुत्र, सोमेश. बत्तिशीत आलेला. लग्नाळू पण लग्न न जमणारा. म्हणजे एकेका कारणानी.. कधी उंच कधी बुटकी.. कधी स्थूल कधी बारीक.. वगैरे वगैरे.. कारणांनी मुलींना नकार देणारा. आतापर्यंत सतरा मुलींना नकार देऊन झालाय. तर या कोल्हटकरांच्या घरात सून आणण्याची तयारी चालू आहे. आता अठरावी येणार आहे.

पूर्वी मुलींचे लग्न जमताना नाकी नऊ येत म्हणे. आता जमाना बदलला की काय?

तर या कोल्हटकरांच्या घरात लग्नाळू सोमेशला बघण्यासाठी पाहुणे येताहेत.

आता तुम्ही म्हणाल त्या कोल्हटकरांच्या घरातील वृत्तांत सांगणारा मी कोण?

मी.. तसा कोणी नाही हो. पण म्हणतात ना दुस-यांचे पहावे वाकून तसा मी कोल्हटकरांच्या घरात जरा वाकून पाहतोय. म्हटलं तर त्यांची कहाणी आणि ती आणखी कोणाकडे होणारच नाही असे थोडीच आहे? तेव्हा पाहूया जरा.. या कोल्हटकरांच्या घरात!

( कोल्हटकरांचे घर. मध्यमवर्गीय घरातील दिवाणखाना.
कुमुद कोल्हटकर.. वय ५५-६० दरम्यान. हॉलमध्ये आवराआवर चाललीये. समोर सोफ्यावर कमलाकर कोल्हटकर.. साठीतील. स्थूल, आणि डोक्यावर केसांची वानवा. हातात पेपर घेऊन वाचत बसलेले. दोघांचे कपडे कुणीतरी घरी येणार असल्यास तसे. आवराआवर करता करता कुमुदबाई गाऊ लागतात. )

बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला.. .बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला.

कमलाकर : वा! कोणाचा मोर असा ( गाल फुगवून ) पिसारा फुलवून बसलाय?

कुमुद : फुलवून बसायला ते काय थोबाड आहे? पिसारा खुलवून बिचारा नाचतोय

कमलाकर : बिचारा? का बरे तो बिचारा?

कुमुद : तसे नाही हो.. बिचारा म्हणण्याची एक पद्धत असते..

कमलाकर : बिचारा म्हणण्याची पद्धत? कोणात? तुमच्या जोश्यांत की काय?

कुमुद : हे पहा, माझ्या माहेरचे नाव घ्यायची काही गरज नाहीय. पण पहा बिचारे मुख्यमंत्री.. बिचारे पंतप्रधान.. म्हणतात की नाही?

कमलाकर : कोणी कायपण म्हणतात.. कोणत्या कोनातून तुला हे मोठमोठे लोक बिचारे वाटतात? बिचा-यांना उगाच बिचारे बनवतेस.. बरं ते जाऊ दे.. तो मनमोराचा पिसारा.. कसा काय फुगला?

कुमुद : ग नाही ल. ( दोन्ही हात फैलावत ) .. अस्सा..

कमलाकर : बाप रे! पण कसा एकदम फुलला?

कुमुद : कसा म्हणजे? ( गाते ) आज कुणी तरी येणार येणार गं..

कमलाकर : बाप रे! बिनाका गीतमाला सुरू करतेस की काय? दुसरे पायदान पर मनमोर.. और पहले पायदान पर.. कोणीतरी येणार येणार गं..

कुमुद : छे! तुम्हाला हौस म्हणून काही नाही.

कमलाकर : म्हणजे मी डल हौसी.. dull हौसी.. नवरा की काय?

कुमुद : ह्या ह्या ह्या.. .काय तो जोक! डल्ल हौशी म्हणे.. आता कोणीतरी येणार.. येणारे..

कमलाकर : काय सांगतेस.. या वयात गुड न्यूज.. वा..! कमाल्ये..

कुमुद : छे! तुमच्या जीभेला काही हाड? पांचटपणा जात नाही मेला.. दोन पोरांचे बाप.. पोराचे लग्न झाले असते तर आता आजोबा होऊन नातवाला नाहीतर नातीला अंगावर घेऊन फिरताना त्याने किंवा तिने लंगोटातून शू केली तर हाताने साफ करत हसत हसत बसायचे तुमचे वय नि या वयात.. या वयात..

कमलाकर : एक मिनीट.. एक मिनीट.. तू जुन्या नाटकात स्वगतं म्हणायचीस की काय? एवढी पल्लेदार वाक्ये पेलतेस म्हणून म्हणतो.. पण सांग कोण येणार येणार.. .

कुमुद : इश्श..

कमलाकर : अगं तुला बघायला कोणी येणार आहे का गं

कुमुद : चहाटळपणा नको.. आपल्या सोमेश.. सोमू..

कमलाकर : हां.. सोम्या? काय त्याचे?

कुमुद : मला नटी म्हणता तर तुम्ही काय प्रोफेसर होतात की काय?

कमलाकर : का बुवा? रिटायर्ड मुख्याध्यापिकांस असे का वाटते?

कुमुद : एवढ्या पटकन विसरलात..

कमलाकर : मी आणि विसरलोय? मी काय विसरलोय? तेच आठवत नाही बघ. मी आता शेंडी वाढवणारे.. कशाला विचार?

कुमुद : मी कशाला विचारू?

कमलाकर : अगं लक्षात ठेवायचे तर मार शेंडीला गाठ.. ही शेंडी नाहीना म्हणून विसरतो.. फक्त ती गाठ मारायची आठवण करत जा तू म्हणजे झाले

कुमुद : मुळात शेंडी साठी डोक्यावर काही तरी हवे ना.. केस? उगाच फाटे फोडतात मि.कोल्हटकर.. सोमू..

कमलाकर : यस्स.. आय रिमेंबर.. आठवले मला.. सोमू.. आपला एकुलता एक.. आठवले

कुमुद : काय आठवले ना? मग तुम्हाला काय वाटते तो ऐकेल?

कमलाकर : ऐकेल नाहीतर काय.. त्याचा बाप ऐकेल

कुमुद : इश्श.. तुम्ही काय ऐकणार..

कमलाकर : कशाबद्दल बोलताय तुम्ही मिसेस कोल्हटकर?

कुमुद : म्हणजे तुम्हाला काहीच आठवत नाही? तुम्ही आठवले म्हणालात ते?

कमलाकर : सोम्या.. अवर डिअर एकुलता सन.. राईट..

कुमुद : मला कळत नाही तुम्ही हे चुकून करतात की मुद्दाम मला चिडवायला..

कमलाकर : तुला चिडवायला? आणि हे म्हणजे? सोमू आपला एकुलता यात मी काय बोल्लो.. .चुकीचे?

कुमुद : तुमची कमाल आहे मिस्टर के.. आज सोमूला बघायला येणारेत आठवते की नाही?

कमलाकर : ओह ओह ओह हो..! यस्स अय रिकलेक्ट.. मि ऍन्ड मिसेस अय्यरा.. येलकम टू अवर हाऊस.. म्हणून मी त्यांचे स्वागत करणार.. डब्बल ऊ.. ई.. येल.. सी.. वो.. येम.. ई..

कुमुद : कौण अय्यर?

कमलाकर : हां अय्यर नाही.. ते ऑफिसात.. त्यांची गंमत सांगू.. येल.. येम.. येन.. वो..

कुमुद : ते जाऊ द्यात.. अय्यर नाही अभ्यंकर..

कमलाकर : (हळूच) किती भयंकर.(मोठयाने) अय्ययो.. नॉट अय्यरा.. मिसेस के सॉरी

कुमुद : तुम्ही तुमचा पांचटपणा सोडू नका.. अभ्यंकर येताहेत.. त्यांची मुलगी.. केतकी..

कमलाकर : हां.. आता मी नसलेल्या शेंडीची नसलेली गाठ सोडू शकतो.. मला आठवले.. मिस्टर आणि मिसेस अभ्यंकर आणि मिस केतकी.. चि.सौ.कां.. .केतकी.. कमिंग टू लूक ऍट माय सोमू..

कुमुद : लूक ऍट? माझा सोमू काय म्युझियम मधला आयटम आहे?

कमलाकर : अगं गम्मत.. इंग्लिसचे तुकडे तोडले ना की ब्रिटीशांवर सूड उगवल्याचे समाधान मिळते.. माझ्या चेह-यावर हे तेज चढले आहे ते पहा..

कुमुद : तेज? ते काल एक्स्ट्रा बटर खाल्लेत ना पावभाजीवर त्यामुळे झालाय तो चेहरा.. तुकतुकीत..

कमलाकर : ओह.. अभ्यंकर येताहेत.. मला आठवण आहे गं.. म्हटलं जरा गंमत. पण काय आहे?

कुमुद : काय.. काय आहे?

कमलाकर : itinerary.. कार्यक्रम पत्रिकेवर काय आहे?

कुमुद : तो काय उद्घाटन समारंभ आहे रिबीन कापायला? पण मला कळाले तुम्हाला काय हवे ते? मेन्यू..

कमलाकर : किती हुशार मिसेस के.. सांग काय खायला आहे? दडपे पोहे की डाळींबी उसळ? डोशाचटणी की म-हाटी मिसळ?

कुमुद : इथे पोराचा पाय ठरत नाही घरात नि .. लग्न जमत नाही नि तुम्हाला उसळ नि मिसळ सुचतेय?

कमलाकर : अगं याला डिनर डिप्लोमसी म्हणतात.. मोठे मोठे नेते लोक पण वापरतात.. म्हणून..

कुमुद : म्हणून काय? तुम्हाला खायचंय बोला.. ते जाऊ देत.. पण सोमू पसंत करेल केतकीस? म्हणजे मला तशी पसंत आहे.. एकदा हा हो बोलला ना की..

कमलाकर : काय गं कितवी?

कुमुद : कितवी? काय?

कमलाकर : खेप?

कुमुद : खेप?

कमलाकर : म्हणजे कितवी मुलगी? बाकी काही म्हण मला खायला मस्त मिळतंय.. इथे कोणी आले तर इथे.. नाहीतर कुठे गेलो की.. त्या रेडकरांकडचा डोसा आणि भडकमकरांकडचा..

कुमुद : तुम्हाला खायचे सोडून सुचते का दुसरे? पण सोमू हो म्हणेल ना हो? एकदा याचे लग्न झाले की आपण जाउयात.. युरोप टूरला..

कमलाकर : हनिमून? for सासूसासरा?

कुमुद : ( शिक्षिकेसारखी ओरडत ) चहाटळपणा नकोय मि.के

कमलाकर : सॉरी मॅडम.. बेंचवर उभा राहू? शाळेतली सवय सुटायची नाय.. तुझी हां.. माझी नाय

कुमुद : अहो बघा ना, माझ्या दिनेशदादाने पाठवलेले स्थळ आहे.

कमलाकर : (हळूच) तरीच.. (मोठयाने) सोमूला नक्कीच आवडेल बघ

कुमुद : तुमच्या तोंडात साखर.. साखर नको.. आधीच डायबिटीस तुम्हाला.. सॅक्रीन पडो..

कमलाकर : अग पण येतात कधी ते अभ्यंकर?

कुमुद : ते येतील हो.. पण या सोमूचाच पत्ता नाही.. आज तरी यायचा ना लवकर

कमलाकर : खरंय तुझे के.. काय गंमत पहा.. तू कुमुद.. मी कमलाकर.. कोल्हटकर.. ती केतकी.. तू तर ट्रिपल के.. केकेके.. कुमुद कमलाकर कोल्हटकर..

कुमुद : चहाटळपणात तुमचा नं वन.. मि. के

कमलाकर : ओ.. .के. मी नवीन सिनेमा काढतो.. चहाटळ नं वन.. मी हीरो तू हिरवीण..

कुमुद : (दुर्लक्ष करीत) अहो पण सोमू मानायला पाहिजेना.. नायतर आणेल कोणी पंजाबीण नाहीतर सिंधीण

कमलाकर : वड्डी.. साई.. मनसुखानी की बालसुखानी?

कुमुद : काही होवो.. मी दुस-या कोणाला घरात घ्यायची नाही.. आपली सून कशी आपल्यातली पाहिजे

कमलाकर : आपल्यातली म्हणजे? चतुष्पाद नको.. द्विपादच हवी.. आणि त्याने तुझ्यापुढे आणून उभी केलीय का कोणी? उगाच तुस्सी.. वड्डी सांई.. सत्श्री अकाल.. .!

( सोमू आत येतो.. )

सोमेश : आई मी आलोय

कुमुद : अरे ये ये सोन्या.. केतकी येतच असेल बरे

सोमू : केतकी?

कुमुद : अभ्यंकर.. केतकी अभ्य़ंकर

सोमू : अभ्य़ंकर की भयंकर?

कमलाकर नि कुमुद एकमेकांकडे पाहातात.. आणि काही बोलता बोलता तो भयंकर शब्द ऐकून गप्प होतात.

कुमुद : (अति मृदूपणे) बाळ सोमेश.. जा तयार हो.. ते येतच असतील!

*****

प्रवेश दुसरा

( अभ्यंकर येऊन गेले आहेत. दुस-यादिवशीची सकाळ. सोमू घरात नाही.. दिवाणखान्यात कमलाकर नि कुमुद बोलत बसलेले )

कुमुद : काय हो या सोमूच्या मनात आहे काय?

कमलाकर : हुं.. काही कळेना.. पण..

कुमुद : नाही.. ही सतरावी झाली .. दरवेळी हा नवीन कारण आणतो कुठून

कमलाकर : हो ना.खरंय तुझे

कुमुद : केतकी चांगली वाटली मला.. वाटले हा हो म्हणेल.. त्यांच्याकडचे तयार होते हो.. दादा म्हणाला.. मग एका महिन्यात लग्न.. काय स्वप्नं पाहिली होती.. बत्तिशीत आला पोरगा.. लग्न जमेना तर ते ही नाही.. यालाच कुणी पसंत पडेना.. दरवेळी नवीनच काही.. काय याच्या मनात.. कधी एकदा याचे जमते कोणास ठाऊक

कमलाकर : आणि आपण युरोपात हनिमूनला जातो..

कुमुद : तुम्हाला चेष्टा सुचतेय.. या घरात मला मेलीला किंमत नाही काही.. सगळीकडे राब राब राबा.. किंमत शून्य..

कमलाकर : सॉरी.. पण हा असा का वागतोय? बरे यानी कोणाला पटविली तर ते ही नाही..

कुमुद : काहीतरी काय बोलता हो.. माझा सोमू त्यातला नाही

कमलाकर : काहीतरीच नाही काही.. अगं शेवटी लग्न जमणं महत्त्वाचे.. its a question of europe tour..

कुमुद : तुम्हाला मी यापुढे काही सांगणार नाही.. इथे पोरगा बत्तिशीत फिरतोय बिन लग्नाचा.. नि बाप मारत फिरतोय.. जोक्स..

कमलाकर : अगं मग काय मारू? मच्छर?

कुमुद : ते काही नाही.. आज त्याला खडसून जाब विचार.. काय त्याच्या मनात ते कळू दे..

कमलाकर : हो विचारतो ना.. खडसून हडसून.. नाही.. हडसून खडसून.. कधी आणतोस तुझ्या आईला सून.. जिचा असेल असा पायगुण.. घरात वाजेल मंगल धून..

कुमुद : तुम्ही बोलता नुसते.. तो आला की काहीतरी जोक मारता की सारेच ओम फस्स.. तुमच्यामुळेच हा असा.. .

कमलाकर : शेफारलाय म्हणायचय का तुला?

( कल्याणी आत येते. कल्याणी म्हणजे त्याची लग्न होऊन सासरी गेलेली मुलगी. अंदाजे तिशी पस्तिशीतील. )

कल्याणी : आई कशाबद्दल गं

कुमुद : अगं कशाबद्दल काय? नेहमीचंच..

कमलाकर : दादाचे लगीन..

कुमुद : अगं तू कधी आलीस?

कल्याणी : अगं ही काय आताच.. आता आले होते इथे तर म्हटलं पाहू हा अभ्यंकर खटला आला कुठपर्यंत

कुमुद : काय असणारे? नकार घंटा..

कल्याणी : का?

कुमुद : ते नको विचारूस.. दरवेळी नवीन कारण.. वैताग नुसता.. अगं याच्या मनात काय आहे तेच कळत नाही

कमलाकर : अगं पुस्तक लिहीतोय तो.. मुलींना नकार देण्याची १०१ कारणे.. सतरा झाली.. आता बाकी १०१ वजा सतरा.. आता त्यानी आणलीना कोणी सरदारीण नाहीतर पंजाबीण तरी चालेल आता तुझ्या आईला

कुमुद : तुम्ही काहीतरीच बोलताय.. शुभ बोल तर म्हणे

कल्याणी : आई, दादा असा ऐकायचा नाही.. काहीतरी जालीम उपाय करायला पाहिजे..

कुमुद : जालीम?

कल्याणी : माझ्या मनात एक आयडिया आहे

कमलाकर : म्हणजे तू काय प्लान बनवून आलीयेस का?

कल्याणी : तसे म्हणा हवे तर.. बाबा आपण ते नाटक पाहिलेल..

कमलाकर : कुठले गं

कल्याणी : लग्नबंबाळ.. तर एक प्लान.. दादाला एमोशनल ब्लॅकमेल..

कुमुद : इमोशनल ब्लॅकमेल म्हणजे?

कमलाकर : अगं कुमे.. म्हणजे म्हणजे वाघाचे पंजे..

कल्याणी : follow me!

( अंधार होतो काही क्षणांसाठी.

तिघेही तिथेच आहेत.. )

कमलाकर : हॅलो, हॅलो.. फोन लागत नाहीये

कुमुद : मग हॅलो हॅलो कोणाला बोलताय?

कल्याणी : बाबा. थांबा, माझ्या फोनवर लावते.

कमलाकर : हां.. अगं आपण किती मूर्खपणा करत होतो.. माझ्याच फोनवर मी बोलणार होतो..

कल्याणी : हां.. लागतोय फोन.. हॅलो.. दादा मी कल्याणी.. घरून.. इकडून.. तिकडून नाही.. ते सोड रे.. लवकर घरी ये.. हां लवकर.. बाबांना बरं नाहीये.. छातीत दुखतंय म्हणतात.. स्ट्रेस आणि काय?.. तू ये.. नाही ऍसिडीटी.. दोन चमचे डायजिन?.. देऊ?.. तू काय डॉक्टर आहेस?.. ( दटावण्याच्या सुरात ) लगेच ये घरी.. ठेवते

कमलाकर : काय म्हणाले चिरंजीव?

कल्याणी : डायजिन घ्या.. दोन चमचे..

कमलाकर : अगं ते नाही.. चमचा येतोय ना? आपलं सोमू येतोय ना?

कुमुद : काय बाई याचं एकेक..

कल्याणी : अगं येतो म्हणालाय..

( रंगमंचावर काही क्षण अंधार, मग हळू हळू उजेड पडायला लागतो कल्याणी उभी , कमलाकर समोर बसून आहे दिवाणावर )

कल्याणी : बाबा हळू.. पडून रहा.. अजून दुखतंय का?

कमलाकर : अगं सगळे डायलॉग्स संपवशील तर तो आल्यावर काय बोलशील?

कल्याणी : पण तुम्ही खरेच झोपा.. केव्हाही येईल..

कमलाकर : गनीम..

कल्याणी : तुम्हाला असे पाहून त्याला काय वाटेल.. सगळाच प्लॅन..

कुमुद : ओम.. फस!

( कमलाकर झोपतो. कुमुद कमलाकरच्या अंगावर शाल पांघरतेय. तेवढ्यात सोमेश आत शिरतो. हातात डॉक्टरांची बॅग )

सोमू : या ना डॉक्टरसाहेब.. काय झाले बाबांना?

कल्याणी : अरे डायरेक्ट डॉक्टरांनाच घेऊन आलास?

सगळे डॉक्टरांकडे बघू लागतात

डॉ : कोण आहेत पेशंट? असे पाहू नका.. काय गं पोरी तुला काय मी हिंदी सिनेमातला वाटलो की काय? कानात स्थेथोस्कोप न लावता पेशंट तपासणारा? बोला कोल्हटकर साहेब. औषधे चालू की नाहीत? शुगर शेवटी कधी तपासलीत? ( तपासू लागतात )

कुमुद : डॉक्टर कधीपासून असे होतंय. छातीत दुखतंय

कल्याणी : आणि घाम सुटतो

डॉ : गंभीर दिसतोय मामला

कुमुद : होय डॉक्टर गंभीरच..

डॉ. : काहीतरी मनाला लावून घेतलंय

कुमुद : होना.. मनावर घेतच नाहीये तो

डॉ : लवकर हलवा कुठेतरी

कुमुद : होय.. लवकर ठरवा.. कुठेतरी

डॉ : मि. कोल्हटकर.. स्ट्रेस.. ताणतणाव.. तोवर मी तुम्हाला हे इंजेक्शन देतोय..

कमलाकर : इंजेक्शन? अहो याचाच मला स्ट्रेस होईल हो..

डॉ : वा.. लवकर बरे व्हायचे तर इन्जेक्शन हवेच.. आणि चिंता नको.. विचार नको.. कुठला स्ट्रेस नको..

कुमुद : तेच मी म्हणते डॉक्टरसाहेब.. पण हा ऐकत नाही

डॉक्टर : कोण कोल्हटकर साहेब? तुम्ही ऐकत नाही? हे मी काय ऐकतोय?

कमलाकर : (उठून बसत) मी नाही हो.. हा सोमू

कल्याणी : बाबा.. झोपा.. विसरलात का?

सोमू : काय विसरले बाबा कल्याणी?

कल्याणी : ( चाचरत ) काही नाही रे.. ते हे.. ते डॉक्टरांनी सांगितले.. विश्रांती.. येस विश्रांतीच..

( डॉक्टर इंजेक्शन देतात.. कमलाकर विव्हळतो.. कल्याणीकडे पाहात.. )

डॉ : मी निघतो.. विश्रांती.. नो टेन्शन.. नो स्ट्रेस..

सोमू : मी डॉक्टरांना सोडून येतो

( डॉक्टर आणि सोमू निघून जातात )

कमलाकर : ( उठून बसत ) च्यायला.. उगीच इंजेक्शन.. दुखतेय

कुमुद : त्याचे काय एवढे? अहो खस्ता खायच्या कशा ते बाईच्या जातीकडून शिका. एका इंजेक्शनाला घाबरलात.. .पण आता पुढे गं कल्याणी?

कल्याणी : इमोशनल ब्लॅक मेल.. येऊ दे सोमूला.. ( नाटकीपणे ) दादा तू येतोस ना?

( थोडा वेळ जातो. सोमेश येतो.. )

कल्याणी : सोमूदादा.. बाबांना खरेच बरं नाही रे

सोमू : खरेच म्हणजे?

कल्याणी : खरेच म्हणजे.. खूप.. जास्तच बरे नाही

सोमू : आता इन्जेक्शन दिलेय.. नाहीतर ऑपरेशन करायला लागेल म्हणाले डॉक्टर

( कमलाकर एकाएकी उठून बसतो नि परत झोपतो.. )

कुमुद : सोमू.. तूच मनावर घे आता. हे टॅन्शन.. नाही सहन होत.. सतरा पोरी झाल्या..

सोमू : आई चूक, अठरा.. केतकी अठरावी.. ती मंजिरी होती ना ती सतरावी

कल्याणी : दादा, तुला नक्की काय हवेय?

सोमू : मला?

कल्याणी : अरे बाबा, बघ बाबा कसे खंगत चाललेत.. ( कमलाकर जमेल तेवढा दीनवाणेपणा त्याच्या तुकतुकीत चेह-यावर आणतो ) तुझ्या चिंतेने आई झोपत नाही.. तोळामासा तब्येत रे त्यांची.. .अरे कमीतकमी बाबांसाठी तरी तयार हो.. की तुला लग्नच नाही करायचंय?

सोमू : मला?

कल्याणी : नाहीतर काय मला?

सोमू : नाही. तू तर परिणीता.. अबनीन्द्र बाबूमोशाय.. शी

कल्याणी : की ऑफिसात कोणी.. मल्लू

सोमू : इल्ले

कल्याणी : भय्याणी..?

सोमू : ऐ जी इ कईसे हो सकत है?

कल्याणी : मड्डुम?

सोमू : नो.. मॅम

कल्याणी : गुजरातीण

सोमू : नथी मारी बहना..

कल्याणी : मग पंजाबीण?

सोमू : ना जी ना.. पंजाबीण णा.. इट्स पारशीण

कुमुद : पारशीण? ( डोक्याला हात मारून घेत ) सोमू.. अरे काय सांगतोयस काय? अरे या आईचा विचार तरी करायचास रे आधी

कमलाकर : अरे हे खरेच की काय?

सोमू : सदा सत्य बोला.. बाबा तुम्हीच ना मला शिकवले?

कुमुद : अरे देवा! अरे मी काय काय स्वप्ने पाहिली.. मिळून मिळून कोण? पारशीण? माझे घर.. माझे चिकन..

कल्याणी : चिकन आई?

कुमुद : माझे किचन.. आपल्यातली तरी पहायचीस.. तरी म्हटले हा दरवेळी नाही नाही का बोलतोय? केतकी.. माझ्या दादानी पाठवलेले स्थळ.. काहीही होवो.. ही खडी पारशीण मी खडी असताना नाही येत..

कल्याणी : अगं आई, असं काय करतेस?

कमलाकर : कुमुद.. अगं आता माघार नाही.. सूनमुख पाहायचे.. व्हेरी सून.. मग ती पारशीण का असेना.. हो म्हण.. कुमे हो म्हण.. कोणीही असो.. हो म्हण. नाहीतर खरंच छातीत दुखेल माझ्या

कल्याणी : बाबा.. तुम्ही विश्रांती

कमलाकर : काय धाड भरलीय मला.. काही असो या इंजेक्शनच्या खस्ता खाल्ल्या तर ही पारशीण मिळाली..

कुमुद : मिळून मिळून पारशीण? लग्नं कशी आपल्या आपल्यात हवीत.. जात ना पात.. .बावा.. बावीण.. बाई बाई..

( इतक्यात कल्याणीचा फोन वाजतो.. )

कल्याणी :( फोनवर ) हॅलो.. आमि एखून आच्छी.. आमादेर घरे.. .सोमेशभय्या.. बिबाहजन्य.. .आमि कोरबो.. कोर्बो.. तडातडी.. .

( सगळे तिचे बोलणे ऐकत गप्प )

सोमू : काय गं कसेत अबनीन्द्र बाबू?

कल्याणी : बरेत.. आई.. .

कमलाकर : मला सांग कुमुद, तुझा एवढा विरोध का?

कुमुद : मी सांगतेना.. आपल्यात रोटी नि आपल्यातच बेटी हवी

कमलाकर : मग आपली बेटी? दिली बरी त्या मासेखाऊंकडे

कल्याणी : बाबा, मासेखाऊ का म्हणता?

सोमू : अगं, मासेमार नाही म्हणाले.. .फ़िशरम्यान!

कमलाकर :.नाही कुमुद.. पण आपल्या कल्याणीला त्या घोषबाबूंनी मानलेच ना आपले? आपण कुठे खातो मासे नि अभक्ष्य?

सोमू : आता खातेच ना ही मासे नि कोंबडीची तंगडी! तरी तू तिला..

कुमुद : ती गोष्ट वेगळी नि ही वेगळी..

कमलाकर : कशी काय? कशी काय वेगळी सांग.. ती तिथेच काढतेय ना माशांचा काटा नि चोखतेय ना मटणाच्या नळया

कल्याणी : बाबा.. काय हे?

कमलाकर : थांब.. तर तुला हे चालते.. आता ही पारशीण आली तर मात्र..

कल्याणी : आई आणि दादा आता बत्तिशीचा झालाय.. पारशी तर पारशी.. काय?

कमलाकर : पारशी तिथे सरशी म्हणतात..

कल्याणी : बाबा तुम्ही कायपण बोलत असतात..

कमलाकर : हे पहा कुमुद, या बत्तिशीच्या घोड्याला पसंत आसलेली ही जी कोणी असेल घोडी..

कुमुद : घोडी कसली? गाढवीण.. माझ्या सोमूला फसवलं असणार तिनं

कल्याणी : आई.. .! आता तुला तिला नाही म्हणून चालणारच नाही.. तेव्हा नो नो नाही हो हो म्हण.. बी पॉझिटीव्ह!

कमलाकर : अगदी खरंय बुवा हिचं..

कुमुद ; आता तुम्ही सगळयांनी माझ्याविरूद्ध कटच केलायत तर.. ठीक आहे.. पारशीण तर पारशीण.. घाला काय गोंधळ घालायचा तो! मी राहते माझी माझी गप्प आणि काय..

कमलाकर : हो हो हो हो.. बिग न्यूज.. नो मोअर डिस्कशन.. काय कुमुद.. आता युरोप.. हनिमून..

कल्याणी : काय बाबा हे?

कुमुद : तुम्ही गप्प बसा.. पोरांसमोर काही बोलतात.. लाज पण नाही वाटत..

कमलाकर : चल नाही बोलत.. देवापुढे साखर ठेवू.. सॅक्रीन नको.. आजचा दिवस.. मज्जानू उगवला नाही. तुझा देव शेवटी पावला गं बाई.. .चल जरा दोघे नमस्कार करू.. अगं जे होतं चांगल्यासाठीच होतं

कुमुद : बस तुमचे प्रवचन.. चला..

( दोघे निघून जातात.)

सोमू : दे टाळी.. माझी लाडाची लाडाची गं.. ताई

कल्याणी : तुझ्यासाठी पाडलं बाबांना आजारी..

सोमू : नुसतंच आजारी नाही.. इन्जेक्शन नाही पण! पण तुला कशी सुचली ही आयडिया?

कल्याणी : आधी तुला कसली आयडीया, ती डॉक्टरांना आणायची? उगाच इन्जेक्शन.. आणि कॉलेजच्या नाटकात कामं करायचे मी.. एक दोन लिहिल्यात पण.. एकांकिका.. तेव्हा प्लॉट कसा रचायचा माझ्याकडून शिक.

सोमू : म्हणजे तुझ्या लग्नात पण तू हे केलेलंस की काय?

कल्याणी : चुप.. ती कोथा आता जुनी.. पण आई शेवटी मानली की नाही.. ग्यारंटीड रिझल्ट दादा. आईने असे नसते ऐकले रे. पण तू त्या अठरा मुलींना कशाला पाहात बसलास?

सोमू : हो ना. पण आई तुला माहितीय ना. आणि एखाद्या गोष्टीची वेळ यावी लागते. त्या अठरा पोरींना माझा सॉरी. पण छान झाले नाटकातल्या नाटकाचे हे नाटक! चल मी मिनूला करतो फोन..

कल्याणी : मिनू?

सोमू : अगं तीच.. मिनू फटफटीवाला..

कल्याणी : फट.. फटी.. वाली?

सोमू : वाली नाय गं.. वाला.. मिनू फटफटीवाला

कल्याणी : (पारशी टोन मध्ये).. ओह.. नै रे नै.. टु मला सांगतेस काय रे डिक्रा?

सोमू फोनवर नंबर लावतोय.. फोनवर बोलतो..

सोमू : मिनू.. गुड न्यूज छे.. मम्मी मानी गई छे.. थ्यांक माय ताई.. टाई नाही ग बाई.. ताई.. मारी सिस.. हवे नो चिंता.. बद्धा चोक्कस.. .हां हां.. पछी. आय.. .हवे सिस्टर छे अहियां.. .

( पडदा पडतो )

# अंक दुसरा

प्रवेश पहिला

सूत्रधार : शेवटी horse took bath in ganges! म्हणजे गंगेत घोडे न्हाले! सोमेशभाऊ चढले बोहोल्यावर. अर्थात तो आधीच तयार होता पण आईला घाबरून त्याची चालणारी चालढकल एकदाची संपवली. पण त्याआधी अठरा मुलींचा खटाटोप! कुमुदबाई शेवटी तयार झाल्याच, आधी मारून मुटकून नंतर मनापासून. हाडाच्या शिक्षिका त्या. पोरापोरींना बघून त्यांच्यातला प्रेमळपणा जागा झाला. त्यामुळे आता सासू सुनेची जमलीय गट्टी. तिकडे मिनूकडे मात्र थयथयाट. मिनूची आई म्हणजे शिरीनचा. मिनूचे पप्पा म्हणजे मि. फटफटीवाला.. जिंदादिल इन्सान. सगळीकडे सगळ्यांना तोलून धरायचा संयम नि शहाणपणा असलेला. शिरीन फुरंगटून बसली तरी तिला संभाळून घेणारा. आता या लग्नालाच आठ नऊ महिने उलटून गेलेत. आणि या कोल्हटकरांच्या घरात आता एक गुड न्यूजही आहे.

( कोल्हटकरांचे घर. थोडी नवीन सजावट. दारावर तोरण वगैरे. लग्न होऊन सात आठ महिने झालेत. म्हणजे तसे नव्या नवरीचे घर. घड्य़ाळयात साधारण दहा वाजलेले दिसताहेत. कमलाकर सोफ्यावर पेपर वाचत नसलेला. घरच्या कपड्यात. दारावरची बेल वाजते. पाठोपाठ आवाज येतो )

मिस्टर कोलटकर असटे काय?

कमलाकर : ( दार उघडत ) अरे वा वा! मी फटफटीया.. आवजो आवजो.. बसा मि. फटफटीया बसा.. what a pleasant surprise.. have a seat फटफटीया..

मि. बेजान फटफटीवाला : ए तू काय बोल्ते रे मि कोलटकर? मी फटफटीया असते काय? फटफटीवाला असते.. .इत्ता टाईम जाला पन अजून नाव नाय शिकते? आनि आवजो जाणाराला बोलते.. .येणाराला नाय.

कमलाकर : शिकते रे.. .पण विसरते.. पण हे फटफटीवाला पहिल्यांदाच ऎकते.. ऐकतोय. दारूवाला.. डबा नि बाटलीवाला.. असतात पण हे फटफटी..

बेजान : ए टू असे कसाला बोलते रे मि.कोलटकर? उगाच साला.. विसरते काय ती साळेत होता.. .म्हंजे साला आपण लोक एकाच साळेत शिकला तवा हे नाव ऎकला होता ना.. विसरते काय?

कमलाकर : हां रे बेजान.. .विसरलो. पण ही दुनिया किती छोटी नाय? स्वप्नात वाटलं नव्हते आपण असे परत भेटू.. इतक्या वर्षांनंतर. या

पोरांमुळे भेटलो.मज्जानू लाईफ.. अरे सोमेश बोलला फटफटीवाला नाव पण माझी ट्यूबलाईट पण नाय पेटली तेव्हा.

( आतून मिनीचा आवाज )

पप्पा कोण छे.. कोणासंग वार्ता करतात?

( बोलत बोलत ती बाहेर येते, बाहेर जाण्याच्या तयारीत.. हातात पर्स नि फाईल.)

मिनू : केटला वडा सरप्राईज पापा.. पापा तमे क्यारे आयवा? मने लाग्युज तमारी जेवी आवाज..

बेजान : अरे डिक्री.. मने लाग्यु.. खूप दिवसांत डिक्री नाय पायली.. पकडली गाडी नि आवी गया.

मिनू : हां पापा.सरप्राईज.. चिक्कू लाव्या?

बेजान : तू काय मने चिकू हमजती?  आ पकड.. घोलवडचा चिकू.. अरे मि. कोलटकर.. बहु फेमस हां.. चिकू.. तमे नथी..

मिनू : आ शू पापा.. पप्पाना मजाक उडावे

बेजान : अरे स्कूल फ्रेंड अमे लोग.. काय बोलते ते.. लंगोटीया यार..

( कुमुद बाहेर येते. ती ही बाहेर जाण्याच्या तयारीत.)

कुमुद : नमस्कार.. नमस्कार.. आज वाट चुकली इकडे.. मिनू चहापाणी बघ पटकन.. लवकर

( मिनू आत जाते )

बेजान : नमस्ते वैनीसाहेब नमस्ते.. पहल्या तुमी वैनी साहेब.. आमच्या फ्रेंडची वाय्फी.. मग संबंधी..

कुमुद : अगं मिनू

मिनू : आले आले मम्मी.. आऊं छूं..

( मिनू हातात ट्रे घेऊन बाहेर येते.)

मिनू : चहा तयारच होता पापा.

कुमुद : तुम्ही आहेत ना? जाऊ नका. डॉक्टरची अपॉईंटमेंट आहे आताची मिनूची

बेजान : अरे मिनू तुला काय जाला? डिक्रा तबियत तो सारी छे ने?

कुमुद : भाईसाहेब, नवीन लग्न झालेली मुलगी गायनॅकॉलॉजिस्टकडे कशाला जाते?

बेजान : डॉक्टरची appointment? साला.. .सॉरी.. तबियत बरी असताना कोण कशाला घेईल.. कोणाला आवडते लाईन लावायला?

मिनू : पापा.. अमे चाल्या.. जता नथी.. आऊंछूं we will be back soon.. सोमेश गेलाय बाहेर.. पुण्याला. चालो मम्मी.. जाऊया.

( दोघी निघून जातात. )

कमलाकर : बोला मि फटफटीवाला

बेजान : अरे कोल्हा.. हे मिनूला काय झाले? डॉक्टरकडे गेली..

कमलाकर : मी कोल्हा तर तू फटफटी.. फटफटी.. साला तू ट्यूबलाईट.. हे फटफटी नि कोल्हा आपल्यात हां.. नायतर बोलशील पोरांसमोर.. तेव्हा आपण कसे सिरीयस रहायला हवे.. पण फटफट्या तुला एवढे पण समजत नाय? कमाल आहे

बेजान : ओह.. ओह ओह ओह.! मी रियल ट्यूबलाईट साला.. मी पण घेलचोदिया.. सॉरी.. आता पडते परकाश डोक्यात.. एक नवा कोल्हा येतोय!

कमलाकर : आता कसा बोललास..

बेजान : साला बहुत खुश जाला मी.. गॉडनी काय छान दिवस उगवलाय पाहिला ओल्ड फॉक्स.. जुना कोल्हा.. वा मंजे आपण साला आजोबा होणार!

कमलाकर : हुं.. फटफट्या.मी पण साला खुश.. तुझी मिनू तुझ्याच भाषेत.. साला खूप चांगली मुलगी रे

बेजान : हुं.. थ्यांक्यू.. पण ते क्रेडीट तिचा मम्मीचे.. आपण साला घरात कधी काडी नाय हालवली.. पण कोल्हा साला काय बात हाय ना.. शाला सोडून चालीस पचास वरस गेली आनि आता आपन भेटणार आजोबा म्हनून.. माजी बायडी हाय ने ती अजून घुस्सा हाय मिनू वर.. पण आता.. ते जाव दे.. अजून साला ते दिवस आटवते.

कमलाकर : तू अजून म्याथस मधे कच्चा काय रे फटफट्या?

बेजान : साला शालेनंतर आपला कॉन्टॅकच नाय.. आनि म्याथची काय वार्ता करते तू. साला बॅंकेत लागला मी ते काय म्याथसिवाय का रे कोल्हा? जाव दे.. आता.. तुझी ते लाईन होती ना.. काय नाव तिचं.. वैशाली..

कमलाकर : साला फटफट्या.. नशीब घरी कोण नाही.. तू पण असा आहेस.. कोणासमोरही काहीही बोलशील.. पारश्या तुला काही पोच?

बेजान : ए कोल्हा.. ते तू मला सांगते? इक्ते दिवस झाला मी कदी बोल्ला काय? अरे आज कोण नाय म्हणून बोल्ला.. ए सांग ना ते वैशाली कुटे असते?

कमलाकर : अरे आता इतक्या वर्षांनी काय माहित? ते शाळेतले दिवस.. what is it called..?

बेजान : पप्पी लव्ह.. साला काय मस्त नाय.. पन तू साला सायंसला गेला.. मी कॉमर्स

कमलाकर : आणि ती आर्टसला. लग्न झाले तिचे. नवरा दारूडा.. हाल झाले तिचे

बेजान : साला पुरी खबर ठेऊन हाय तू तिची

कमलाकर : नाय रे जे माहित ते दहा वर्षांपूर्वीचं.. रहायची ती डोंबिवलीला. नंतर काय माहित. पण असे व्हायला नको होतं, म्हणजे तिचा माझा संबंध नाही पण फटफट्या मला काय वाटते सगळयांनी कसं खूशच रहायला पाहिजे.. साला देवानी हे दु:ख का बनवले असेल फटफट्या? सगळे खुश.. ह्याप्पी..

बेजान : म्हंजे माजी पोरगी अस्ते तशी? रियल हॅपी.. आनि ती हॅपी त आपन लोक हॅपी.. साला काय गोंदल जाला सांगू.. माज्या घरी ते एक बायडी असते ना शिरीन..

कमलाकर : एक बायडी म्हणजे? किती असते बायडी तुझी?

बेजान : चुप रे कोल्हा.. तर ते शिरीन एवडी चिडली.. साला मिनू एका मराटी पोरासंग.. ते काय बोल्तात ते तूफान.. नाय टायफून.. टायफून जाला घरामदी

कमलाकर : मग?

बेजान : मग काय विचारतो तू? अरे तुला सांगतो ते माझा जुबिन असते ना.. माजा डिक्रा रे.. लई हूशार.. त्याने पटवला मम्मीला तवा ती ॲंग्री जाली.. पण अजून ॲंग्री हाय.. ॲंग्री.. घुस्सा.. काय नाटक केला जुबिन नी

कमलाकर : इथे पण तीच स्टोरी मि.फटफट्या..

बेजान : फटफटीवाला..

कमलाकर : तेच ते.. तर इथे माझी मोठी मुलगी आली नि असला ड्रामा केला. पण काही म्हण मिनू नि सोमू आयडियल जोडी आहे.. आणि कुमुद

आणि मिनू पण.. मला वाटलं कुमुद पण रागारागात राहिल पण नाही.. दोघांची गट्टी मस्त.. हॅप्पी.. खूश

बेजान : अरे कोल्हा.. मी काय बोल्ते.. म्हण्जे शिरीनला बोल्ते.. अरे हा गॉड असते ना ते काय बोल्ते?

कमलाकर : काय बोल्ते? मी नाय आईकते

बेजान : भंकस नाय कोल्हा.. साला सिरीयस हो.. मी काय म्हणते.. साला इतून तितून सारा गॉड लोग एक असते.. मग साला हा पारशी, तो हिंदू असला झगडा कशाला रे? बायडी लोगला काय कळते नाय..

कमलाकर : खंरय तुझं

बेजान : मी काय बोल्तो ना हा हिंदू ने सीख ने पारसी साला माणसने बनवला नि गॉडला पन माणसने बनवला..

कमलाकर : साला फटफट्या.. तू शाळेतला वाटत नाहीस.. मस्तीखोर.. दररोज वर्गाबाहेर जाणारा

बेजान : अरे साला माणस मोटा होते की नाय?

कमलाकर : होते ना.. तू तेव्हा लुकड्या होतास.. आता झालायस मोटा..

बेजान : कोल्हा.. भंकस नको.. अरे किती सिरीयस फिलॉसॉफी सांगतो मी नि तू हसते? अरे सारे गॉड माणसाचीच लेकरे.. सॉरी सारी माणसे एका गॉडची पोरापोरी.. तर आपुन लोग साला भांडत बसते. शिरीनला पटते पन ते काय बोल्ते तुज्या मराटीत.. कलते पन वलते नाय.. पन आता येईल लायनीवर.. जुबीन असते त्यानी बरोबर केला.. आता ती खुश होईल.. मिनूची न्यूज आईकून.. साला शिरीनपण आजीबाय बन्ते काय? बुढ्ढी जाली.. आता मी चिडवेल तिला. बुढिया.. आटवते आपण लोक ते बुढियाके बाल खायचो?

तशी शिरीन होईल बुढिया.. बुढ्ढीचे बाल.. हा हा.. साला माजा जुबिन हुशार असते..

कमलाकर : तुझा पोरग असूनही? सॉरी, सॉरी तू तर फिलॉसॉफर झाला रे फटफट.. फटफटिया.. फटफटीवाला.

बेजान : साला फिलॉसॉफी काय नाय.. तुला सांगते.. एकच फिलॉसॉफी.. चार दिवसची जिंदगी.. .बी हॅप्पी.. मेक अदर्स हॅपी.. एवड्या तेवड्याने साला भांडण कसाला? जुबिन घेऊन आला.. बंगाली. पोट्टी चांगली हाये.. शिरीन काय बोलते..

कमलाकर : ओह! झुबिनचे ठरले तर! मिनू नाही बोलली

बेजान : अरे तिला कुटे म्हायती? कालच तर शिरीनला पटवली.. मग आला मी घोलवडचे चिकू घेऊन.. पहिले मिनूला सांगतो.. कदी येतील रे.. साला मला टेन्शन.. माजी पोरगी घरी तवा टेन्सन. तुला दिली तरी टेन्सन.. डॉक्टरकडे गेली तर टेन्सन?

कमलाकर : साला फटफट्या.. खावानू पिवानू.. मज्जानू लाईफ.. नो टेन्शन

( दोघे बोलत बसतात. आवाज हळूहळू मागे पडतो. दिवे मंदावत जातात. थोडे क्षण अंधार.. मग उजेड पडतो. तेव्हा दोघे बसलेले. मिनू आणि कुमुद घरात शिरतात.)

कुमुद : झाली बाई तपासणी. काय गर्दी.. डॉक्टर म्हणाले सगळे काही ठीक..

बेजान : ते तर ठीकच ना वैनीबाय.. तुमी लोक असताना मिनू ठीकच अस्ते ना इथे.. नो टेन्शन.. साला.. सॉरी ते वैनीबाई तोंडात बसलेला शब्द.. आय याम हॅपी.. आज आपण लोक आजी आजोबा होते..

मिनू : पापा.. जेवण बनवायला घेते..

बेजान : डिकरा.. जमवानू अने रमवानू..

कमलाकर : लाईफ केटलू मज्जानू..

कुमुद : भाईसाहेब.. मी पण जाते.. जेवण बनवतो आम्ही दोघी.. आज आनंदाचा दिवस

बेजान : अरे मिनू.. उभी रहा नि.. अजून एक गूड न्यूज.. जुबीनची ती बंगाली पोरगी.. शिरीनला पटवला.. तुजी मम्मी मानली..

मिनू : पापा.. मम्मी मानी गई? बहुज सरस.. चारूलता.. झुबिनची होणारी बायको.. चारूलता.. पप्पा, मम्मी कदीपासनं नाय नाय म्हणत होती.. झुबिनने मॅनेज केली

कमलाकर : चला मि. फटफटिया. आज डायबिटीस विसरून तोंड गोड करू.. गुड न्यूज ही गुड न्यूज

कुमुद : हुं.. मी बरी खाऊ देते तुम्हाला.. सॉरी भाईसाहेब आम्हाला जायला लागलं.. डॉक्टरांची अपॉईंटमेंट नेमकी आजच

बेजान : अरे वैनीसाब.. नो formality.. आनि असे पन आम्ही या कमलाकरच्या शालेतल्या गर्लफ्रेंडची आटवन काडत बसलो.. मस्त वेळ गेला की नाय कमलाकर?

कमलाकर : तुमी काय पण वार्ता करते मि. फटफटीवाला

कुमुद : तुम्ही बसा.. मी आणि मिनू पटकन करतो सगळे.. मग पानं घेऊ..

( कुमुद आत निघून जाते.

परत दोघेच उरतात.)

बेजान : साला कोल्हा.. लाईफ म्हंजे मज्जानू गोश्ठ बग.. मज्जानू जेवण.. मज्जानू रमण.. .. साला नाय जमते कविता. तू करायचा ना शालेमदी.. ( हळूच ) ती वैशालीवर लिवलेली मी वाचली होती.. . आता करते की नाय? ऐकव एक दोन.. तेवडाच टायमपास..

कमलाकर : ऐकवतो.. पण.. नक्की ऐकायची ना?( उठून एक डायरी आणतो.)
ऐक.. अनामिकेची कविता.. (वाचता वाचता उजेड हळू हळू मंदावत जातो)

किती तरी वर्षांनी
काल तू दिसलीस
पाहिलेस का मला तू?
की पाहूनही नाही पाहिलेस?
मी पाहत होतो थबकून
तू तर गेलीस पुढे निघून

ओळखलेस का मला?
कशी ओळखशील?

एक तर आपली ओळखच नव्हती ना
कॉलेजच्या सोनपंखी दिवसात
कधी मधी चुकून दोन शब्द
आणि आता
मी हा असा बदललेला
कृतांत कटकामलध्वजा दिसणारा

खरे सांगू मी काय पाहिले?
मला आवडणारी तू होतीस
सुंदर आणि हासरी
तशीच अजून आहेस का
सुंदर आणि साजरी

सांगू तुला पाहून काय वाटले?

तुझ्या ओझरत्या दर्शनात
काय मी पाहिले?
कोणी तरी तुला ठेवतोय ना गं सुखात
खरेतर
मलातरी दुसरे काय हवे होते?

एकदा तुला भेटायचेय
तू खुश आहेस हे कान भरून ऐकायचेय
पण
मी लाख बोलेन तुझ्याशी
तू ते मला का सांगशील?
तुझी माझी ओळख होती ना जराशीच

एकच.. .

नव्हतो मी प्रियकर
नव्हतीस तू प्रेमिका
नाव तुझे ठाऊक तरीही
माझ्यासाठी तू अनामिका

बेजान : वा! वा! कमलाकर वा!

( बोलत असतानाच पडदा पडतो.)

प्रवेश दुसरा

पडदा पडलेला. समोर सूत्रधार अवतरतो

सूत्रधार
काळ जायला वेळ लागत नाही म्हणतात! बघता बघता दिवस सरले.. मिनूचे बाळ आले या घरात. असे म्हणतात आई बापाच्या हृदयाच्या तुकड्यांतून जन्माला येते ते मूल नि ते न चालता न बोलता सगळयांवर राज्य करते. आता शिरीनबाई मिनूवर कितीही रागावल्या नि रूसल्या तरी या चिमण्याबाळापुढे त्यांचे काय चालणार आहे? त्याच्या दंतहीन हास्यात त्यांचा राग नि रुसवा-फुगवा वाहून नाही गेला तरच नवल!
तर आज तन्वीर म्हणजे सोमू-मिनूच्या बाळाचा महिन्याप्रमाणे तिसरा वाढदिवस. आणि शिरीनबाई शेवटी येणारच त्यांच्या घरी. तर पाहूयात आज काय होतंय या कोल्हटकरांच्या घरात!

( कोल्हटकरांचे घर. तोच दिवाणखाना. आता जुना थोडा दिसणारा. थोडा पसारा. एक वर्ष उलटून गेलंय. मिनू नि सोमेशचे बाळ रडण्याचा आवाज आतून येतोय. पाठोपाठ आतून मिनूचा आवाज.. हां डिकरा.. मारा शोना.. सूई जा हवे,,दूदू पी आणि झोपून जा.. जो जो..
हॉलमध्ये सोमू मोबाईल हातात घेऊन बसलाय. घड्याळात वेळ साधारण दहा वाजण्याची. दरवाजावरची बेल वाजते. पाठोपाठ आवाज .. )हाय का कोलटकर? छे के नाय घरमदी?
( सोमेश दार उघडतो. समोर मि आणि मिसेस फटफटीवाला.. म्हणजे बेजान आणि शिरीन )

सोमू : अरे वा! पापा! तमे आवी गया! मम्मी तमे पण? तुमचीच वाट पाहात होतो.. प्लीज कम.. बसा

बेजान : डिकरा सुतेला छे के? एटली बधी शांतता..

सोमू : हां.. मिनी झोपवतेय त्याला. काल रात्री झोपला नाही. खेळत होता. रात्र झाली की दिवस सुरू होतो त्याचा

बेजान : आनि आमचा फ्रेंड.. कोलटकर कुठे हाय?

सोमू : आहेत ना बाबा.. अंघोळीला गेलेत. आणि आई देवळात.. आज चतुर्थी

शिरीन : त्रण महिनु थई गयुं बाबूने

सोमू : हां मम्मी. तारखेप्रमाणे आज तिसरा महिना.. आवुछूं हा.. जरा बघतो झोपला का

( सोमू आत निघून जातो.)

शिरीन : एक वार बाबुने जोवानुं छे..

बेजान : हां, एटले माटेज आय्वा ना अमे अहिंया..

( कमलाकर बाहेर येतो )

कमलाकर : अरे बेजान.. नमस्ते शिरीनवैनी.. वेलकम,,तन्वीर आताच झोपला.. रात्रभर जगावलंय बच्चूनी.

शिरीन : छोटा बाळ असते ना ते पूरी दुनियाला नाचवते तेच्याभोवती

बेजान : अने पोते तर चालता पण नथी.. केम कोलटकर

कमलाकर : साची वात छे

बेजान : अरे तू गुजराती सिखी गया?

कमलाकर : थोडूक थोडूक.. मिनूचे ऐकून

शिरीन : हं.. हू जाऊं छू.. मिनूला पाह्यला

कमलाकर : जा ना वैनी..

( शिरीन आत निघून जाते )

कमलाकर : ( तिला आत जाताना पाहात ) बोल फटफट्या

बेजान : अरे कोल्हा.. साला ओल्ड फॉक्स.. तुला काय सांगू? शिरीन was adamant.. नाही येत म्हणे.. अजून angry मिनूवर. मी काय बोलते मिनू ला भीती वाटत असनार

कमलाकर : भीती?

बेजान : अरे मी तिला ओळखते ना.. तिला राग टिकवायचा पण असते नि यायचे पण.. तिला म्हायती हाय एकदा आली ना तर तिचा घुस्सा खत्तम

कमलाकर : अरे छोटे बाळ आहे ना.. he is the ruler

बेजान : हां.. बोलते नाय.. चालते नाय.. पण नाचवते समद्यांना.. पण आय ऍम ह्यापी.. साला आजोबा जाला त्याची मज्जा हाय.. जुबिनची शादी.. लवकरच.. अजून मज्जा.. तेवडा शिरीनचा मूड संबाळला की जाला.. अरे कोल्हा.. मला सांग हे असेच चालत राहणार काय?

कमलाकर : असेच म्हणजे?

बेजान : म्हण्जे हे अशी जोडी सलामत राहिल शेवटपरेंत.. साला शिरीन नसेल तर घर चालते नाय.. तुला पण तसाच असनार.. वैनीसाब नाय तर घर नाय.. पोरंपोरी हायत तर घरात रौनक हाय

कमलाकर : अरे फटफट्या.. साला फिलॉसॉफी झाडतो.. पण कळत कायनाय तुला.. अरे आला दिवस मजेत घालवायचा. उद्या काय होणार? कोणी पाहिले? अरे नवरा बायको पैकी कुणी तरी पुढे जाणारच.. कोणी मागे राहणार.. मग काय गेला दिवस आठवायचा.. पण त्यासाठी आजचा दिवस तर मजेत घालवायला हवा.. म्हणजे म्हातारपणी ते आठवायला बरे

बेजान : म्हातारपणी? तू साला स्वत:ला यंग समजते की काय.. डोक्यावर नाय एक बाल.. पण तू बोलते ते साचू.. साला आला दिवस मज्जानू.. बी हॅपी.. मजा करवानूं.. मेक अदर्स हॅपी. मग काय आहेच आपले.. ओल्ड एज. साला तुजी ती वैशाली बुढ्ढी झाली असेल नाही?

कमलाकर : कोणास ठाऊक? पण असेल तशी असो.. आता इतक्या वर्षांनी तिचा चेहरा पण नाही आठवत.. ते जाऊ देत,,तू बोल.. झुबिन खूश?

बेजान : अरे तो उडतो.. फ्लाईंग इन एयर.. म्हणजे पायलट हाय ना.. चारूलता.. तेची फियान्सी.. तिला घेऊन भटकतो.. मी बोलला साला दोनचार महिन्यात म्यारेज हाय.. मग साला कंटाळला तरी पण पाठ सोडनार नाय ती.. पण साला हे यंग पोरांचे दिवस पाहून बरे वाटटे.. पोरापोरी खूश तर आपण पण खूश.. .अरे ते वैनीसाब कुठे गेल्या?

कमलाकर : अरे आज चतुर्थी.. देवळात गेलीय

बेजान : तुला सांगतो या बायडी लोकचे लाइफ असाच.. मी काय म्हणतोना ते वाईफचे अर्धा लाईफ देवलात.. शिरीनचा पन असाच.. साला मिनूशी बोलत नव्हती.. पण नक्कीच कायतरी मन्नत मानून बसली असनार.. तुला सांगते साला बायडी लोगले इनसिक्युरिटी फार..

बेजान : बेजान.. साला मगाशी तू बोललास ते एकटे पडण्याबद्दल ती काय इनसिक्युरिटी नव्हती रे?

बेजान : खरंय तुजा कोल्हा.. साला हुशार तू फॉक्स.. वकील व्हायला पाहिजे होता तू

कमलाकर : पण तू म्हणतोना ते खरंय.. इन्सिक्युरिटी.. माझी एक नवीन कविता .. ऐकवू?

बेजान : लवकर.. कोनी यायच्या आत.. साला पलून जायचा कोनी.. तुजा गाना ऐकून

कमलाकर : हां.. गाना.. .ऐक.. संसाराचे गाणे..

वेड लावी जिवा
हा प्रेमाचा पाऊस
प्रिया म्हणे राजा
नको ना जाऊस

धुंद झाली हवा
धुंद ते चांदणे
हसता ती जरा
क्षणी मिटती भांडणे

दिवस दिवस
कसा सरतो असा
मनमोर तिचा
फुलवी पिसारा कसा

पाऊस प्रेमाचा
गाणे ही प्रेमाचे
वर्षाव अखंड
तराणे प्रेमाचे

प्रेमी ही प्रेमाने

भेटले जिवाने
फिरती कसे दोन
होऊन दीवाणे

पाऊस पाऊस
प्रेमपावसाच्या सरी
पुरी हौसमौस
भरल्या घरी

होणार ते झाले
वेल संसारी फुलली
राजा ही धावतो
राणी संसारी गुंतली

गुंगली दंगली
भुंग्यासारखी गुंगली
मोठी झाली पोरे
पांगली पांगली

दोघे ते उरले
संसारी मुरले
एकमेकांसाठी
भरून उरले

काळ थांबतो कोठे
कधी कोणासाठी
राजाच उरला
राणी काळापाठी

एकटाच राजा
एकटेच घर
कसे सरले आता
ते प्रेमाचे अंतर

आठवे तो कसा
प्रेमाचा पाऊस
राणी म्हणे तेव्हा
तुला ना कसली 'हाऊस'
सरे संसाराचे गाणे
सरती दिवस सरतो पाऊस
एका डोळयाने हासणे
आणि दुज्यात टिपूस

बेजान : वा वा.. खरंय तुजा कोल्हा.तू खरंच हुशार रे.. आतापरेंत असाच बोलत होता तुला मी हुशार..

( कुमुद देवळातून घरी येते. )

कुमुद : अरे वा .. भाईसाहेब.

बेजान : हां.. वैनीसाब आनि आज शिरीन पन आलीय

कुमुद : वा वा.. आज संकष्टी, देवळात जाऊन आले..

बेजान : हां हां.. माजा फ्रेंड बोलला.. साला.. सॉरी.. याला पन घेऊन जायचा देवलमदी.. देवाच्या पायावर.. थोडी अक्कल येईल

कुमुद : हुं.. ते कसले येतात देवळात? काम नसले तर लोळत पडतील पण देवळात नाहीत.. सोन्या झोपला वाटतं.. .रात्र जागवली पोरानं

कमलाकर : जागवली कसली.. गाजवली.. जा शिरीन आत असणार..

( कुमुद आत जाते.

थोडे क्षण शांतता.. .सोमू आणि मिनू बाहेर येतात )

मिनू : पापा.. केम छो? सोन्या झोपला.. आताच.. थाकी गई..

सोमू : याची झोप अशी.. थोडा आवाज झाला की उठतो..

मिनू : पापा.. मम्मी पण ठीक छे ने.. बोलली माझ्याशी..

बेजान : अरे डिकरी.. तू चिंता नको करू.. ते शिरीन हाय ना डेलिकेट हाय.. बाहेरून आव आणते पण तिला यायचे कदीपास्नं.. आता तुजा तन्वीर तिला सरळ करेल पाहा.

शिरीन आणि कुमुद आतून बाहेर येतात.

शिरीन : जोईले केम? केटलू स्वीट छे बाबू.. डिक्रो अमारो..

कुमुद : झोपलाय. हसतोय पण झोपेत. मिनूची कॉपी अगदी

बेजान : वैनीबाय.. ते रात्री रडते ना, ते मिनूची कॉपी आने आता हसते ते आमच्या जावयराजाची कॉपी..

मिनू :( खोट्य़ा रागाने ) पप्पा.. तमे पण मारा एनिमीनी साईड.. थी वात करोछो?

शिरीन : एक बोलवानू हतुं.. बोलू काय?

कमलाकर : बोला वहिनी.. मनमोकळेपणाने बोला.. ही मिनू आलीय आमच्या घरी आनंदीआनंद झालाय.. त्यात आता बाळाचे आगमन..

शिरीन : कई नथी.. भाईसाहेब.. कुमुदताई.. म्हणजे आम्ही तसे ठरवून नाही आलेले.. मी पण घुश्श्यात होतीना.. पण आता या सोन्याचे तोंड पाहिले.. बद्धा घुस्सा गायब.. तर एक बिनती..

कमलाकर : बोला ना शिरीनवहिनी

शिरीन : म्हंजे घुश्श्यात एक गलती झाली.. सॉरी.. पण आता राग नको.. तुमी ते मिनूला थोडे दिवस पाठवा.. घोलवडला.. नाही म्हणू नका.. झुबिन पण शादी करतोय..

बेजान : साला.. आमचे घर.. छोट्या बाळाच्या आवाजाला तरसते रे आमचे घर.. तीन महिने वाट पाहिली.. रे कोलटकर

कमलाकर : अहो असं काय? मिनू तुमचीच..

कुमुद : नि बाळ पण तुमचेच. मिनू बेटा जा तू माहेरपणाला.. आम्हाला थोडे दिवस होईल चुकल्यासारखे.. पण मिनू परत येईलच ना.. सोमू इथे म्हटल्यावर! काय सोमू? जाऊ दे ना तिला?

सोमू : आई! आता तुम्ही सगळेच फितूर झाले तर .. मी काय बोलणार?

( रंगमंचावर अंधार होतो.. पुन्हा उजेड..

शिरीन, बेजान, कडेवर बाळ घेऊन मिनू पुढे, मागे बॅग हातात घेऊन सोमू बाहेर निघताहेत.

पाठून कमलाकर नि कुमुद त्यांना टाटा करतायत.. आवजो.. जल्दी.. )

(समाप्त)

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची

ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

"Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow."

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .

हा नंबर सेव्ह करून या नंबरला 7710980841किंवा

तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके

whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे .

तेdownload करा .

हे सर्व मोफ़त आहे.